सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक १४/१०/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन गृह विभाग, शासन निर्णय क्र.अपीओ-०७२२/प्र.क्र.७८/पोल-३, दि.११ ऑक्टोबर २०२४

**विषय :-** महामार्ग पोलीस मदत केंद्र चिंचोटीसाठी मंजूर पदे मीरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर वर्ग / स्थानांतरणाने उपलब्ध करुन देणेबाबत

******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. अपीओ-०७२२/प्र.क्र.७८/पोल-३, दि.११ ऑक्टोबर २०२४ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४१०१११२३५२००९२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयनुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक (वाहतुक),महाराष्ट्र राज्य,मुंबई.
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर-वसई-विरार
कार्यासन अधिकारी, का.क्र. २६-अ

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

महामार्ग पोलीस मदत केंद्र, चिंचोटीसाठी मंजूर पदे मीरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर वर्ग/ स्थानांतरणाने उपलब्ध करुन देणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

### शासन निर्णय क्रमांकः अेपीओ-०७२२/प्र.क्र.७८/पोल-३

मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई.
दिनांक : ११ ऑक्टोबर, २०२४.

वाचा :-

१) अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. पोमसं/२६-अ/४७/वा. म. कें. चि. पदे -मिभाववि/०५/२०२२, दि.०१.०७.२०२२, दि.०८.०५.२०२४ व दि.१९.०८.२०२४.
२) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दि.०२.०६.२०१५.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासन, शासन निर्णय, गृह विभाग, दिनांक १३.०९.२०१९ अन्वये ठाणे ग्रामीण व पालघर पोलीस घटकाचे विभाजन करुन, मीरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयाची स्थापना करण्यात आली आहे. मीरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालय आस्थापनेतंर्गत येणाऱ्या कार्यक्षेत्रामध्ये पालघर व ठाणे ग्रामीण घटकांतील कार्यक्षेत्राचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यामध्ये महामार्ग पोलीस मदत केंद्र चिंचोटी येत आहे. चिंचोटी महामार्ग पोलीस मदत केंद्रांच्या कार्यक्षेत्रात येणारा मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग-४८ हा मीरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयातून येतो. त्यामुळे वाहतुकीचे नियोजन आयुक्तालयातील वाहतुक शाखेकडून करण्यात येते. त्यामुळे प्रशासकीयदृष्ट्या महामार्ग पोलीस मदत केंद्र चिंचोटीची साधनसामग्री व मनुष्यबळ तसेच वाहतूक नियमनाचे कामकाज मीरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयास हस्तांतरीत करण्याची विनंती पोलीस महासंचालक कार्यालयाने संदर्भाधीन क्र.१ च्या पत्रांद्वारे शासनास केली आहे.

त्यानुसार अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाच्या आस्थापनेवरील महामार्ग पोलीस मदत केंद्र, चिंचोटीसाठी मंजूर असलेली पोलीस उप निरीक्षक-०३ व अंमलदारांची ३३ पदे मीरा-भाईंदर-वसई-विरार, पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर वर्ग करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय:-</u>**

अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाच्या आस्थापनेवरील महामार्ग पोलीस मदत केंद्र, चिंचोटीसाठी मंजूर असलेली पोलीस उप निरीक्षक-३, पोलीस हवालदार-६, पोलीस शिपाई-२४ व चालक पोलीस शिपाई-३ अशी एकूण ३६ पदे मीरा-भाईंदर-वसई-विरार, पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर वर्ग/स्थानांतरणाने उपलब्ध करून देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. उक्त शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दि.०२.०६.२०१५ व्दारे विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या <u>www.maharashtra.gov.in</u> या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४१०१११२३५२००९२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA T
BHALWANE

Digitally signed by RAJENDRA T BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA T BHALWANE
Date: 2024.10.11 12:21:56 +05'30'

**( रा. ता. भालवणे )**
**उप सचिव, गृह विभाग**

**प्रत,**

१) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) अपर मुख्य सचिव (वित्त),वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५) प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८) पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर-वसई-विरार.
९) अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई/ठाणे/पालघर.
१०) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई/ठाणे/पालघर.
११) उप सचिव(पोल ३),गृह विभाग,मंत्रालय,मुंबई.
१२) वित्त विभाग (व्यय-७)/वित्तिय सुधारणा-१/आ.पु.क.
१३) निवड नस्ती, पोल-३.